Topic 3 Social Institution
सामाजिक संस्था

## (A) सामाजिक संस्था :- अर्थ आणि वैशिष्ट्ये
## Social Institutions :- Meaning and characteristics.

प्रस्तावना :-
संस्था हा शब्द आपण दैनंदिन व्यवहारामध्ये वेगवेगळ्या अर्थाने उपयोगात आणत असतो. परंतु समाजशास्त्रीय दृष्ट्या सामाजिक संस्था या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. सामाजिक संस्था ही एक समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना आहे. म्हणूनच समाजशास्त्र हे सामाजिक संस्थांबाबतचे शास्त्र आहे असे म्हटले जाते.

* अर्थ :- (Meaning) :- मानव प्राण्याचे स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी सतत धडपड, प्रयत्न, सुरु असतात. हे अस्तित्व टिकवत असताना त्यामधून अनेक गरजांची निर्मिती झालेली आहे. अशा सर्व सदस्यांच्या गरजा पूर्ण होणे आवश्यक असते. या गरजा म्हणजे उदा. प्रजोत्पादन, बालसंगोपन, उदर्निर्वाह, समाजीकरण, लैंगिक गरजांची पूर्तता इ. मात्र अशा गरजा पूर्ण करत असताना प्रत्येक व्यक्तीने कसे वागावे, कसे वर्तन करु नये या-विषयीचे वर्तनाचे विशिष्ट प्रकार समाजात निर्माण झालेले असतात त्याला 'सामाजिक नियमने' म्हणून ओळखले जाते. व्यक्तीच्या गरजांची पूर्तता सामाजिक नियमनांच्या आधारे केली जाते. यातून अनेक सामाजिक संस्था उदयास आलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

1) लैंगिक गरजांची समाजमान्य मार्गाने पूर्तता करण्यासाठी - <u>विवाहसंस्था</u>.
2) प्रजोत्पादन, बालसंगोपन आणि संवर्धन - <u>कुटुंबसंस्था</u>.
3) सामाजिक नियंत्रण, मानसिक सुरक्षितता व एकता टिकवण्यासाठी - <u>धर्मसंस्था</u>.
4) उदर्निर्वाह करण्यासाठी, आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी - <u>अर्थसंस्था</u>
5) शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, लोककल्याणासाठी - <u>राज्यसंस्था</u>.

वरील सर्व सामाजिक संस्था समाजात सर्वत्र दिसून येतात सामाजिक संस्थांची निर्मिती वेगवेगळ्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी

Scanned with CamScanner

झालेली असते. समाजमान्य मार्गाने परस्परपूरक कार्य संस्थांद्वारे करून होत असल्याने मानवी समाजात संस्थांना स्थिर स्वरूप प्राप्त झाले आहे. सामाजिक संस्थांमुळेच संस्कृतीचे संवर्धन करणे शक्य झालेले आहे. 'मानवी समाजात अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक नियमनांच्या सहाय्याने व्यक्तीच्या असंख्य गरजा पूर्ण करण्याचे कार्य ज्याच्याद्वारे केले जाते त्यास सामाजिक संस्था असे म्हटले जाते.

व्याख्या :- (Definition) :-

1) ऑगबर्न आणि निमकॉफ :- "सामाजिक संस्था म्हणजे काही मूलभूत मानवी गरजा भागविण्याचे संघटित आणि प्रस्थापित असे मार्ग होय."

2) किंग्जले डेव्हिस :- "एक किंवा अनेक कार्याच्या पूर्ततेसाठी निर्माण केलेला परस्परसंबंधित लोकरूढी, लोकनीती आणि कायदे यांचा संच म्हणजे 'सामाजिक संस्था' होय."

3) ग्रीन :- "सामाजिक कार्य पार पाडण्यासाठी अनेक लोकरूढी, लोकनीती यांचे एकत्रित झालेले संघटन म्हणजे 'सामाजिक संस्था' होय."

4) हॅरी जॉन्सन :- "सामाजिक संस्था म्हणजे मान्यताप्राप्त प्रमाणकांचे प्रतिमान होय."

वरील काही व्याख्यांच्या आधारे असे दिसून येते की मानवाच्या काही मूलभूत गरजा असतात. त्या गरजांची समाजमान्य मार्गाने पूर्तता करणारी व्यवस्था म्हणजे 'सामाजिक संस्था' होय." सामाजिक संस्था सामाजिक संबंधांची व्यवस्था असून ते सामाजिक नियमांचे व प्रमाणकांचे संघटन असते.

Page No.
Date: / /

## सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये :-
## Characteristics of Social Institutions :-

प्रत्येक मानवी समाजात अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक संस्थांची आवश्यक तत्वे व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

1) **सार्वत्रिकता :-**

सामाजिक संस्थांची निर्मिती सामाजिक संबंधांमधून झालेली असते. त्यामुळे सामाजिक संबंध व सामाजिक संस्था यांचे अस्तित्व सर्व समाजात दिसून येते. लोकसंख्येने मर्यादित असणारा आदिवासी समाज असो किंवा व्यापक शहरी समाज असो प्रत्येक समाजात सामाजिक संस्था निदर्शनास येतात. कारण मानवाच्या काही मूलभूत गरजा भागविण्याचे प्रस्थापित मार्ग म्हणून संस्थांना ओळखले जाते. परिणामी सामाजिक संस्थांचे स्वरूप व अस्तित्व मानवी समाजात सार्वत्रिक स्वरूपात दिसून येते.

2) **निश्चित उद्देश :-**

मानवाच्या अनेक गरजा आहेत. या विविध गरजांची पुर्तता करण्यासाठी सामाजिक संस्थांची निर्मिती झालेली आहे. प्रत्येक सामाजिक संस्थेचा उद्देश विशिष्ट प्रकारचा असतो. अशा विशिष्ट प्रकारच्या उद्देशांची पुर्तता सामाजिक संस्थांच्या सहाय्याने केली जाते. उदा. आर्थिक उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी अर्थसंस्था, लैंगिक गरजांच्या पुर्ततेसाठी विवाहसंस्था अस्तित्वात आलेली आहे. म्हणजेच मानवाच्या गरजा व निश्चित उद्देश पूर्ण करायचे साधन म्हणून सामाजिक संस्थांना ओळखले जाते.

3) **अनियोजित विकास :-**

सामाजिक संस्थांची निर्मिती योजनापूर्वक किंवा नियोजनबद्ध केली जात नाही. तर समाजाच्या उत्क्रांतीच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत विविध सामाजिक संस्था उदयास येत असतात अशा संस्थांना कालांतराने विशिष्ट संरचना, रचना प्राप्त होते. या संस्था मानवी समाजात स्थिर होतात. लोक सतत गरजा भागवण्याचे विविध मार्ग शोधत असतात. अशावेळी विशिष्ट गरजांची पुर्तता

Scanned with CamScanner

करणारा एखादा मार्ग सदस्यांकडून वारंवार स्विकारला जात असेल तर त्या मार्गाला सामाजिक संस्थांचे स्वरूप प्राप्त होते. म्हणजेच सामाजिक संस्था अनियोजितपणे विकसित होत असतात.

४) **रचना :-**

विशिष्ट उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी सामाजिक संस्थांना रचनात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. विशिष्ट रचनेशिवाय संस्था अस्तित्वात राहत नाही. उद्दिष्ट पूर्ततेचे कार्य विशिष्ट अशा रचनेमुळे घडून येते. रचनेमुळे संस्थेतील सदस्यांच्या वर्तनाचे नियंत्रण करणे शक्य झाले आहे. विशिष्ट दर्जानुसार व्यक्तीला भूमिका पार पाडाव्या लागतात. अशा भूमिका पार पाडताना काही नियमांचे पालन करावे लागते. याचाच अर्थ विशिष्ट उद्दिष्ट पूर्ण करताना सामाजिक संस्थांना रचना प्राप्त होते. सामाजिक जीवनातील सर्व संस्थांना विशिष्ट अशी निश्चित प्रकारची रचना प्राप्त झालेली असते.

५) **सापेक्ष स्थिरता :-**

सामाजिक संस्थांचे स्वरूप सापेक्षतः स्थिर स्वरूपाचे असते. संस्थांच्या स्वरूपामध्ये सहसा बदल होत नाही. संस्था या निरंतरपणे अस्तित्वात असतात. मौखिक आणि लिखित परंपरांच्या माध्यमातून सामाजिक संस्था टिकून राहतात. हजारो वर्षापूर्वी निर्माण झालेल्या काही संस्था उदा. कुटुंबसंस्था, विवाह संस्था यामध्ये आजदेखील फार मोठ्या प्रमाणात बदल झालेले नाही. बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक संस्थांमध्ये बदल होणे आवश्यक आहे. मात्र होणारे बदल मंद गतीने होत असतात. संस्थांची रचना आणि कार्य यामध्ये घडून येणारा बदल मंद गतीचा आहे. याचाच परिणाम सामाजिक संस्था सापेक्षतः स्थिर स्वरूपाच्या निर्माण झालेल्या आहेत.

६) **प्रतिके :-**

प्रत्येक सामाजिक संस्थांची विशिष्ट प्रकारची प्रतिके असतात. ही प्रतिके भौतिक किंवा अभौतिक या दोन्हीही प्रकारची असू शकतात. प्रतिके ही सामूहिक जाणीवेची भावना, निष्ठा, आकर्षण

Scanned with CamScanner

इ. गोष्टी संस्थेच्या सदस्यांच्या मनामध्ये निर्माण करतात. ही प्रतिके त्या संस्थेचे प्रतिनिधीत्व करतात. उदा. राष्ट्रध्वज; राष्ट्रचिन्ह इ. राज्यसंस्थेची प्रतिके आहेत. तर मंगळसूत्र, कुंकू ही विवाहसंस्थेची प्रतिके आहे. तो हिंदू विवाहसंस्थेची जाणीव करुन देतात. अशा प्रकारची प्रतिके समाजात प्रचलित असतात. त्या प्रतिकांवरुन संस्थेची ओळख होते. प्रतिकांचा अर्थ समजून घेतल्यानंतर त्या संस्थेच्या भावना, पवित्रता, अपवित्रता यांची जाणीव होते.

७) विशिष्ट वर्तन :-

निश्चित उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक समाजामध्ये सामाजिक नियमांची व्यवस्था निर्माण झालेली असते. त्या व्यवस्थेनुसार प्रत्येक व्यक्तीला निश्चित दर्जा प्राप्त झालेला असतो. त्या दर्जानुसारच भूमिका पार पाडण्यासाठी संस्थेच्या अपेक्षेप्रमाणे विशिष्ट वर्तन व्यक्तीला करावे लागते. अन्यथा सदस्यांकडून विशिष्ट वर्तन न झाल्यास त्या संस्थेची उद्दिष्ट्ये व्यक्तीच्या व समाजाच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.

८) लिखित व अलिखित नियम / रचना :-

सामाजिक संस्थांमध्ये सदस्यांना विशिष्ट दर्जा प्राप्त होत असतो. त्यानुसार त्याला भूमिका पार पाडाव्या लागतात. यासाठी संस्थेला काही नियम असतात. ज्यामुळे संस्थेचे कार्य व्यवस्थितपणे सुरु राहते, संस्था टिकून राहते म्हणजे संस्थेला विशिष्ट रचना प्राप्त झालेली असते. ही रचना लिखित किंवा अलिखित प्रकारची असू शकते. उदा. आदिवासी समाजातील संस्था अलिखित स्वरुपाच्या असतात तर प्रगत समाजातील काही संस्था लिखित स्वरुपाच्या असतात. त्यांना लिखित रचना प्राप्त झालेली असते. उदा. कायदेसंस्था व न्यायसंस्था म्हणजेच सामाजिक संस्था या रचनाबध्द असतात. त्या रचना, कार्य, उद्दिष्ट्ये लिखित किंवा अलिखित असू शकतात.

९) उपयुक्त साधनांचा वापर :-

सामाजिक जीवनामध्ये व्यक्तीच्या गरजा आणि उद्दिष्टांची पूर्तता करत असताना फक्त सामाजिक नियमने

Scanned with CamScanner

९) उपयोगी ठरत नाहीत तर काही साधनांची गरज असते. या साधनांच्या सहाय्याने व्यक्तीला आपले उद्दिष्ट पूर्ण करता येते. उदा. धर्म संस्थेच्या संदर्भात मंदीर, धर्मग्रंथ इ. कुटुंबसंस्थेच्या संदर्भात घर आणि घरातील साहित्य. काही उपयुक्त साधनांचा वापर केल्याशिवाय संस्थेला आपली उद्दिष्ट्ये पूर्ण करता येत नाहीत.

१०) **मानवी व्यवहारांवर नियंत्रण :-**

सामाजिक संस्था आपल्या सदस्यांकडून समाजमान्य वर्तनाची अपेक्षा करतात. अशावेळी समाजमान्य वर्तन घडून येण्यासाठी मानवी वर्तन आणि व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य संस्थाच पार पाडतात. कारण आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता संस्थेने ठरवून दिलेल्या मार्गानेच करावी लागते. समाजमान्य नसलेल्या मार्गाने गरजांची पूर्तता करण्यास संस्था परवानगी देत नाहीत. एक प्रकारे मानवी व्यवहार, वर्तनावर सामाजिक संस्थांद्वारे नियंत्रण ठेवले जाते.

११) सामाजिक संस्था परस्पर संबंधित असतात.

१२) सामाजिक संस्था अमूर्त स्वरूपाच्या असतात.

वरीलप्रमाणे समाजमान्य मार्गाने मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी संघटित आणि प्रस्थापित झालेला मार्ग म्हणजे सामाजिक संस्था होय. या समाजशास्त्रातील संकल्पनेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये विशद केली जातात. कुटुंब, धर्म, विवाह, शिक्षण, राज्यसंस्था, कायदे संस्था इ. त्यांची उदाहरणे आहेत.

Scanned with CamScanner

## (ब) सामाजिक संस्थांचे महत्व
## (Importance of Social Institutions)

समाजाच्या दृष्टीने सामाजिक संस्था अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात. व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या दृष्टीने सामाजिक संस्था जी कार्ये पार पाडतात त्यातच त्यांचे महत्व सामावलेले आहे. विशिष्ट कार्यांच्या पूर्तीसाठीच विशिष्ट संस्था निर्माण होत असल्या किंवा केल्या जात असल्या तरी सर्व सामाजिक संस्थांची समाजातील सर्वसाधारण कार्ये किंवा महत्व पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**१. सामाजिक व्यवहारात सुलभता निर्माण करणे :** विविध सामाजिक प्रसंगात विशिष्ट दर्जावरील व्यक्तींनी कसे वागावे याची निश्चिती सामाजिक संस्था करतात. प्रत्येकाला आपापले हक्क व कर्तव्ये कोणती याचे सुस्पष्ट मार्गदर्शन संस्था ज्या नियमांनी करते त्यामुळे होत असल्याने सामाजिक व्यवहारात सुलभता निर्माण होते. प्रत्यक्षात वागताना व्यक्तींनी सामान्यत: गोंधळाच्या स्थितीला तोंड द्यावे लागत नाही. सामाजिक व्यवहार भविष्यकथनक्षम होतात, त्यात नियमितता येत असते.

**२. व्यक्तिवर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करणे :** सामाजिक संस्था व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन करतात किंवा त्या व्यक्तिवर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करतात. कसे वागावे व वागू नये याविषयीचे स्पष्ट मार्गदर्शन संस्था करतात. त्यामुळे व्यक्तीच्या स्वैराचारी वृत्तीला आणि अनियमित वर्तनाला आळा घातला जातो.

**३. दर्जा व भूमिका प्रदान करून व्यक्तीला त्यासाठी तयार करणे :** सामाजिक संस्था म्हणजे दर्जा व भूमिकांचे जाळे असते. परंपरेनुसार किंवा व्यक्तीच्या कर्तृत्वाच्या आधारावर व्यक्तींना दर्जे प्रदान करणे व त्या त्या दर्जा-भूमिकानुसार वागण्यास व्यक्तींना तयार करणे हे काम सामाजिक संस्था करीत असतात. उदा. दर्जानुसार कसे वागावे याचे ज्ञान कुटुंब, शिक्षण या संस्था व्यक्तींना करून देतात.

**४. समाजाचे स्थैर्य व सातत्य अबाधित राखून त्यात व्यवस्था निर्माण करणे :** सामाजिक संस्था व्यक्ती व समाजाच्या मूलभूत गरजांची पूर्ती करतात व त्यायोगे समाज सातत्यास हातभार लावतात. संस्था सापेक्षत: स्थिर असल्यामुळे समाजालाही स्थैर्य लाभते. व्यक्तिवर्तनावर व सामाजिक व्यवहारांवर संस्था नियंत्रण ठेवीत असल्यामुळे समाजात गोंधळ किंवा अव्यवस्था निर्माण होत नाही. समाजाला सामाजिक संस्थांमुळेच संघटित स्वरूप प्राप्त होते वा रचना लाभते. समाजातील व्यवस्था (Order) टिकवून ठेवण्यामध्ये सामाजिक संस्था अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावतात. साहजिकच प्रत्येक सामाजिक संस्था ही मानवाचे अस्तित्व टिकविण्यामध्ये अत्यंत महत्वाची ठरते.

Scanned with CamScanner